**महाराष्ट्र शासन**

**नोंदणी व मुद्रांक विभाग**

**<u>जाहीर निविदा सुचना पत्रक</u>**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे महाराष्ट्राच्या ५५१ कार्यालयात संगणक हार्डवेअर तसेच अनुषंगिक सेवा बांधा वापरा हस्तांतर करा या तत्वावर पुरविणे याकरीता मोहोरबंद पाकिटातुन निविदा मागवित आहेत. निविदेचा तपशिल खालीलप्रमाणे :-

<u>सेवा पुरवठादाराने</u>

१) आवश्यक निकषाप्रमाणे संगणक हार्डवेअर सॉफटवेअर पुरविणे व सुस्थितीत करणे.

२) करार कालावधीत त्याची देखभाल करणे.

३) डाटा एन्ट्री व स्कॅनिंग करण्याकरीता प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयास मनुष्यबळ पुरविणे.

४) इंटरनेटची सुविधा सर्व दुय्यम निबंधक कार्यालयास पुरविणे व त्याची देखभाल करणे.

५) डाटा बेस व्यवस्थापन व स्कॅन केलेल्या प्रतिमांचे जतन करणे.

६) विशिष्ट स्वरुपाचे डाटा रॅक दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक, नोंदणी उपमहानिरीक्षक व नोंदणी महानिरीक्षक कार्यालयांना पुरविणे. इत्यादी.

निविदेचा फॉर्म नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, नवीन प्रशासकिय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे येथे सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व कार्यासन अधिकारी क्र.७ यांचे कक्षात कामकाजाच्या दिवशी दिनांक ०७/०५/२०१० ते २७/०५/२०१० या कालावधीत सकाळी १०.३० ते दुपारी ५.३० या वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) व शेवटचे दिवशी दिनांक २८/०५/२०१० रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० वाजेपयंत रु.५,०००/-(ना-परतावा) किंमतीस उपलब्ध असतील. निविदेचा फॉर्म महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर, तसेच या विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदेकाराने वेबसाईटवरुन निविदा फॉर्म डाऊनलोड केला असेल तर सीलबंद निविदा सादर करताना रु.५,०००/- ही निविदेची फी अदा करणे आवश्यक राहील. निविदेच्या अटी व शर्ती तसेच या संदर्भातील सुचना निविदा पुस्तिकेत नमुद केलेल्या आहेत.

सीलबंद निविदा वरील पत्यावर स्विकारल्या जातील. त्या स्विकारण्याचा अंतिम दिनांक २८/०५/२०१० दुपारी ३.०० वाजेपर्यन्त राहील. निविदांचे तांत्रिक लिफाफे नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, नवीन प्रशासकिय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे येथे नोंदणी महानिरीक्षक यांचे कक्षात त्याच दिवशी उघडण्यात येतील.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२३८२६/२६१३८४३२
इमेल : igr_it@hotmail.com
पत्ता : नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, नवीन प्रशासकिय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे